**ठळक बातम्या**

- सुझुकीच्या इलेक्ट्रीक वाहन प्रकल्पाचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन/ मेक इन इंडियाच्या प्रवासातला हा नवा अध्याय असून मेक फॉर वर्ल्डच्या दिशेनं ही मोठी झेप असल्याचं केलं प्रतिपादन

- सुदर्शन चक्र हा प्रकल्प भारताचा संरक्षक पोलादी कवच असल्याचा संरक्षण दल प्रमुखांचा विश्वास

- मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदासाठी न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांच्या नावाची शिफारस

**आणि**

- गणरायाच्या आगमनाची सर्वत्र जय्यत तयारी

**<><><><><>**

भारताच्या मेक इन इंडियाच्या प्रवासात आज एक नवा अध्याय जोडला जात असून मेक फॉर वर्ल्डच्या दिशेनं ही मोठी झेप आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. गुजरातमधल्या हंसलपूर इथं मेड इन इंडिया बॅटरी इलेक्ट्रिक वाहनं - 'ई वितारा'चं उद्घाटन प्रधानमंत्र्यांनी केलं, त्यावेळी ते बोलत होते. ही वाहनं युरोप आणि जपानसारख्या प्रमुख बाजारपेठांसह शंभराहून अधिक देशांमध्ये निर्यात होणार आहेत. भारत आणि जपान संबंधांना यामुळे नवा आयाम मिळेल असं प्रधानमंत्री म्हणाले.

**होल्ड बाईट मोदी**

येत्या काळात सर्व क्षेत्रात देशाला प्रगती करायची आहे. आजच्या प्रयत्नामुळे २०४७ चं विकसित भारताचं ध्येय नवी उंची गाठेल, जपान या ध्येयाच्या प्राप्तीत भारताचा विश्वासार्ह मित्र असेल अशी खात्री त्यांनी व्यक्त केली.

गुजरातच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर असलेल्या प्रधानमंत्र्यांनी इथल्या सुझुकी मोटार प्रकल्पालाही भेट दिली. प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीत हंसलपूर इथं हायब्रिड बॅटरी इलेक्ट्रोड्सच्या स्थानिक उत्पादनाचाही प्रारंभ झाला. तोशिबा, सुझुकी आणि डेन्सो यांचा हा संयुक्त उपक्रम आहे.

<><><><><>

अमेरिकेनं भारतातून आयात केलेल्या वस्तूंवर लादलेला अतिरिक्त २५ टक्के कर उद्यापासून लागू होणार आहे. याबाबतच्या सूचना आज जारी झाली. भारत रशियाकडून तेल आयात करत असल्यामुळे ट्रम्प यांनी काहीच दिवसांपूर्वी भारतावर हा अतिरिक्त कर लादला होता. हा कर अन्याय्य असून भारताच्या हितासाठी शक्य ते सगळं करू, असं प्रत्युत्तर भारतानं दिलं आहे.

<><><><><>

सुदर्शन चक्र हा प्रकल्प हे भारताचा संरक्षक पोलादी कवच असून ते देशाच्या धोरणात्मक, नागरी आणि राष्ट्रीय महत्वाच्या ठिकाणांचं रक्षण करेल असं प्रतिपादन संरक्षण दल प्रमुख जनरल अनिल चौहान यांनी केलं. मध्यप्रदेशात आर्मी वॉर कॉलेजमध्ये आयोजित दोन दिवसीय रण संवाद-२०२५ ला ते आज संबोधित करत होते. संरक्षण सुविधांचा विकास आणि शत्रुच्या हालचालींचा मागोवा आणि त्या निष्प्रभ करणे या गोष्टींचाही यात अंतर्भाव असेल असं ते म्हणाले. संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरता तसंच कृत्रिम बुद्धीमत्ता, सायबर आणि क्वां◌ंटम तंत्रज्ञान यांचं महत्व त्यांनी यावेळी अधोरेखित केलं.

<><><><><>

बिहारमधे मतदारयाद्यांच्या पुनरिक्षणादरम्यान ९९ पूर्णांक ११ शतांश टक्के मतदारांकडून कागदपत्रं मिळाली असून दावे, हरकती आणि कागदपत्र दाखल करण्यासाठी अद्याप सात दिवस शिल्लक आहेत, असं केंद्रीय निवडणूक आयोगानं जाहीर केलं आहे. बूथ पातळीवरचे अधिकारी आणि स्वयंसेवकांच्या मदतीनं

राबविण्यात येणारी संकलन निर्धारित वेळेपूर्वी पूर्ण होण्याची अपेक्षा आहे, असंही केंद्रीय निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

नांदेड ते मुंबई वंदे भारत ट्रेनला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दूरस्थ पद्धतीने हिरवा झेंडा दाखवला. वंदे भारत एक्स्प्रेसमुळे नांदेड राजधानी मुंबईच्या अधिक जवळ आलं असून यामुळे मराठवाड्याच्या समृद्धीचं दार उघडलं गेल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

या गाडीचा लाभ मराठवाड्यातल्या प्रमुख जिल्ह्यांना होईल, असा विश्वास माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी व्यक्त केला. तर नांदेड ते मुंबई विशेष रेल्वे सुरू करण्यासाठीही प्रयत्न करू असं खासदार अजित गोपछडे यांनी सांगितलं.

मुंबई ते नांदेड हे ६१० किलोमीटरचं अंतर ९ ते साडे नऊ तासात पूर्ण होणार आहे. या रेल्वे गाडीची क्षमता ५०० वरून १४४० पर्यंत वाढवण्यात आली असून गाडीचे डबे ८ वरून  २० पर्यंत वाढवण्यात आले आहेत.

<><><><><>

मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदासाठी न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांच्या नावाची शिफारस सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायवृंदानं केली आहे. सध्या ते मुंबई उच्च न्यायालयातच न्यायाधीश म्हणून काम करत आहेत. सध्याचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती आलोक आराधे यांची सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती करायची शिफारसही न्यायवृंदाने काल केली. तसंच मुंबई उच्च न्यायालयाच्या सहा अतिरिक्त न्यायाधीशांना कायमस्वरूपी नियुक्त्या देण्याची शिफारसही न्यायवृंदाच्या कालच्या बैठकीत करण्यात आली.

<><><><><>

१० दिवस चालणाऱ्या  गणेशोत्सवाला उद्यापा्सून सुरुवात होणार असून गणरायाच्या स्वागतासाठी सर्वत्र जय्यत तयारी होत आहे. महाराष्ट्रात यंदा

गणेशोत्सवाला राज्य उत्सवाचा दर्जा मिळाल्यामुळे उत्साह द्विगुणित झालेला दिसत आहे आणि त्याच्या तयारीला वेग आला आहे. याबद्दल अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून.

***व्हीसी-(१.३२ सेकंद)***

*गणरायाच्या आगमनाच्या आदल्या दिवशी आज घरोघरी हरतालिका पूजन झालं. उद्या सर्वत्र सार्वजनिक आणि घरगुती गणेशमूर्तींची वाजतगाजत स्थापना होईल. मुंबईत दरवर्षी दहा हजारापेक्षा जास्त सार्वजनिक आणि दोन लाखांपेक्षा जास्त घरगुती गणपतींची स्थापना केली जाते. यंदाही लालबागचा राजा, सिद्धिविनायक अशा सार्वजनिक गणपतींसह घरगुती गणपतींच्या स्वागतासाठी मुंबापुरी सज्ज होत आहे. गणपतीचं मखर, आरास, सजावटीचं सामान, फुलं इत्यादी खरेदी करण्यासाठी बाजारपेठांमध्ये लगबग आहे. बस आणि रेल्वेस्थानकांवर गणपतीसाठी कोकणात जाणाऱ्यांची गर्दी दिसून येत आहे.*

*हा सण अधिकाधिक पर्यावरणपूरक करण्यासाठी महानगरपालिकेनं दरवर्षीप्रमाणे यंदाही आत्तापर्यंत जवळपास एक हजार टन शाडू माती मूर्तिकारांना मोफत पुरवली आहे. हा सण सुरक्षितरीत्या साजरा व्हावा, यासाठी सार्वजनिक आरोग्य, रस्त्यांची देखभाल, दुरुस्ती, घनकचरा व्यवस्थापन, वाहतूक नियंत्रण विभाग सज्ज आहेत. गणरायाच्या आगमनाप्रमाणेच विसर्जनही निसर्गस्नेही करण्यासाठी ६८ नैसर्गिक विसर्जनस्थळांसोबतच महानगरपालिकेनं जवळपास ३०० कृत्रिम तलाव तयार केले असून विसर्जनस्थळी निर्माल्य कलशही उपलब्ध करून दिले आहेत. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी १९१६ या क्रमांकावर संपर्क साधावा, असं आवाहन महानगरपालिकेनं केलं आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी, मुंबईहून, अंकिता आपटे.*

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी युक्रेनच्या स्वातंत्र्यदिनी शुभेच्छा दिल्याबद्दल युक्रेनचे अध्यक्ष व्लादिमीर झेलेन्स्की यांनी आभार मानले आहेत. जागतिक स्तरावरची शांतता आणि संवाद यांच्याशी भारत वचनबद्ध असल्याबद्दल झेलेन्स्की यांनी आपल्या समाजमाध्यम संदेशात प्रशंसा केली आहे.

**<><><><><>**

बीडब्ल्यूएफ बॅडमिंटन जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतल्या पुरुष एकेरीतलं भारताच्या लक्ष्य सेनचं आव्हान काल संपुष्टात आलं. जागतिक क्रमवारीत अव्वल

असलेला चीनी खेळाडू शी यू ने लक्ष्य सेनचा २१-१७,२१-१९, असा पराभव केला. ऋतुपर्णा आणि श्वेतपर्णा या पांडा भगिनींही पहिल्याच फेरीत पराभूत झाल्या. बुल्गारियाच्या गॅब्रिएला आणि स्टेफनी यांनी त्यांचा २१-१२, २१-११ असा पराभव केला.

<><><><>

अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत कार्लोस अल्काराझने अमेरिकेच्या रेली ओपेल्काला तीन सरळ सेट्समधे हरवून विजयी सलामी दिली. आज त्याचा सामना इटलीच्या माट्शिया बेलुसी बरोबर होईल.

<><><><>

बिहारमध्ये गंगा नदीच्या पाणीपातळीत  वाढ होण्याबाबतचा  ऑरेंज अलर्ट केंद्रीय जलपरिषदेने दिला आहे.  आज अनेक निरिक्षण स्थानकांजवळ पाण्याने धोक्याची पातळी ओलांडल्याची माहिती परिषदेने काढलेल्या विशेष निवेदनात दिली आहे. पाटणा, भागलपूर अशा अनेक ठिकाणी गंगेच्या पाणीपातळीत खूप  वाढ होईल असा इशारा दिला आहे. गंगेच्या खोऱ्यातील इतर नद्या उफाणल्या आहेत. कोशी नदी बालताराजवळ धोक्याच्या पातळीवरुन वाहत आहे. शोन नदीच्या जलस्तरातही वेगाने वाढ होत आहे. आणि रोहतास जिल्ह्यात यदुनाथपूरजवळ ती धोक्याच्या पातळीच्या एक मीटर वरुन वाहत आहे.

<><><><>

देशाच्या विविध भागात आजही पावसाचा जोर आहे.

पंजाब आणि हिमाचल प्रदेशात सातत्यानं पडणाऱ्या पावसामुळे भाक्रा, पोंग आणि रणजित सागर धरणांचे काही दरवाजे उघडले आहेत. त्यामुळे नदी किनाऱ्यावरील गावांना सर्तक राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. पठाणकोठ जिल्ह्यातील अनेक गावांना पुराचा तडाखा बसला असून नागरिकांना हेलिकॉप्टरच्या मदतीनं सुरक्षित ठिकाणी नेलं आहे. या ठिकाणी गावकऱ्यांच्या

मदतीसाठी एनडीआरएफ आणि लष्कराची पथकं तैनात केले आहेत. बियास नदीला आलेल्या पुराचा फटका कपूरथला च्या सुलतानपूर लोधी इथल्या २० हून अधिक गावांना बसला आहे.

**<><><><><>**

देशाच्या विविध भागात आजही पावसाचा जोर आहे.

**जम्मू आणि काश्मीरच्या** रामबन जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून पडणाऱ्या पावसामुळे जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावरची वाहतूक बंद ठेवली आहे. हरयाणा, राजस्थान आणि हिमाचल प्रदेशात ठिकठिकाणी मुसळधार पाऊस होत असून अनेक ठिकाणी वाहतूक बंद झाली असून जनजीवनही विस्कळीत झालं आहे.

गुजरातमध्ये शनिवारपर्यंत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा तर राजस्थानातही उद्यापर्यंत पाऊस पडेल असा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला आहे. महाराष्ट्रातही मुंबईसह कोकण, ठाणे, **पालघर,रायगड, रत्नागिरी आणि मराठवाड्याला** पावसाचा यलो अलर्ट दिला आहे.

**दिल्ली, चंदीगड, हरियाणा, पंजाब, जम्मू** आणि **काश्मीर, लडाख, ओदिसा** आणि आंध्रप्रदेशच्या किनारपट्टी भागात उद्या मुसळधार पावसाची शक्यता आहे. तर **छत्तीसगढ, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड,** मध्य प्रदेशाचा पश्चिम भाग, मध्य महाराष्ट्र, कोकण, गोवा, कर्नाटकची किनारपट्टी, केरळ, तेलंगणा इथं अनेक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. बिहार, गुजरात, झारखंड, तेलंगणा, नागालँड, मणिपूर, मिझोरम, त्रिपुरा आणि अंदमान निकोबार इथं वादळी वारे, विजांच्या कडकटासह मुसळधार पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**//<><><><><>//**